ISSN 2229-4406

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# UNIVERSAL RESEARCH ANALYSIS

URA

EDITOR IN CHIEF
Dr. BALAJI KAMBLE

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

DEGLOOR COLLEGE DEGLOOR ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY Dist. Nanded

6

# भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील आव्हाने

**डॉ. अशोक टिप्परसे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
देगलूर महाविद्यालय,
देगलूर, जि. नांदेड (महाराष्ट्र) भारत

**Research Paper - Economics**

**प्रस्तावणा :**

आज भारताला स्वातंत्र्य मिळून ६८ वर्ष होत आहेत. स्वतंत्र्यानंतर भारताने आर्थिक विकासासाठी नियोजनाचा स्विकार केला. पंचवार्षिक योजनांच्या साह्याने भारतीय अर्थव्यवस्था विकासाकडे वाटचाल करीत असली तरी आजही भारतीय अर्थव्यवस्थे पुढे अनेक आव्हाने आहेत. जे विकास कार्यात अडथहा ठरत आहेत. आज भारतीय अर्थव्यवस्था विकासशील अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जात असली तरी अनेक समस्या भारतीय अर्थव्यवस्थेला अल्पविकसित राष्ट्रांचा (पंक्तीत) ओळीत नेवून बसवणाऱ्या आहेत. खरे तर नियोजनात्मक विकासाच्या धोरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास नियोजनबध्द, ठराविक कालावधीत होईल अशी अपेक्षा होती. परंतु आजही नियोजनाची १२ वी पंचवार्षिक योजना चालू असताना देखील पुढील आव्हाने भारतीय अर्थव्यवस्थेपुढे दत्त म्हणून उभी आहेत.

आज भारतासमोर वाढती लोकसंख्या, दारिद्र्य, बेकारी, शेतीची अल्पउत्पादकता, आरोग्य, शिक्षण, भांडवलाची कमतरता, उत्पन्नविषमता, दरडोई उत्पन्न कमी, लघु व कुटिर उद्योगाच्या समस्या, पायाभूत सुविधांची कमतरता, वाहतुक व दळणवळणाच्या समस्या इ. अनेक आव्हाने भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला अडथळा निर्माण करीत आहेत. एकीकडे आज भारत महासत्ता बनण्याचे स्वप्न पाहत आहे आणि आर्थिक विकासात अडथळा ठरणारी आव्हाने आजही संपलेली नाहीत.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE 1938

भारतीय अर्थव्यवस्थे समोरील आव्हाने / समस्या :

१. वाढती लोकसंख्या :

आज भारतीय अर्थव्यवस्थेसमोरील सर्वात मोठे आव्हान ही वाढती लोकसंख्या आहे. लोकसंख्या ज्या वेगाने वाढत आहे त्या तुलनेत विकासाची साधणे वाढत नसल्याने वाढती लोकसंख्या एक समस्या बनलेली आहे. सन १९६१ मध्ये ४३.९ कोटी असणारी भारताची लोकसंख्या सन २००१ मध्ये १०२.७ कोटी इतकी झाली तर सन २०११ च्या जनगणनेनुसार ती १२१ कोटी इतकी झाली. वाढती लोकसंख्या उत्पादनाच्या साधणारावर अतिरिक्त ताण निर्माण करते. उत्पादनाची साधणे अपुरी पडू लागतात व विकासाची गती खुंटते त्याच बरोबर अन्नधान्य व इतर उपभोग्य वस्तुंची मागणी वाढते त्यामुळे विकासाच्या इतर साधणाकडे दुर्लक्ष होते. थोडक्यात वाढती लोकसंख्या अर्थव्यवस्थेच्या विकासाला मारक ठरते.

२. दारिद्रय व बेकारी :

भारतीय अर्थव्यवस्थे समोरील दारिद्रय व बेकारी हे फार मोठे आव्हान ठरत आहे. विकासाची साधणे ज्या प्रमाणात वाढत आहेत त्याच्या कितीतरी पटीने लोकसंख्या वाढत आहे. म्हणजेच विकासाची साधणे अपुरी पडत आहेत. म्हणजेच लोकांना रोजगार नाही आणि रोजगार अभावी लोक दारिद्रय रेषेखाली जीवन जगत आहेत. सन २००४-०५ च्या आकडेवारीनुसार भारतात दारिद्र्याचे प्रमाण २१.८% इतके आहे. तरी बेकारीचे प्रमाण कार्यक्षम लोकसंख्येच्या ८% इतके आहे. आर्थिक मंदीच्या काळात तर हे बेकारीचे प्रमाण वाढलेले असते.

३. दरडोई उत्पन्न कमी :

भारतातील लोकांचे दरडोई उत्पन्न फारच कमी आहे. विकसित राष्ट्राच्या दरडोई उत्पन्नांशी तुलना करता हे प्रमाण फारच अल्प आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने नियोजनात्मक विकासाला सुरुवात केली तरीही दरडोई उत्पन्नात वाढ करता आली नाही. दरडोई उत्पन्न कमी तर बचत कमी, रोजगार कमी, रोजगारा अभावी पुन्हा प्रतीव्यक्ती उत्पन्न कमी अशा बिकट समस्येमुळे भारतातील लोकांचे उत्पन्न कमी आहे.

४. अल्प कृषी उत्पादन व उत्पादकता :

भारत कृषी प्रधान देश म्हणून ओळखला जातो. आजही भारतात ५८% लोक शेती व संबंधीत व्यवसाय करतात. तरी पण विकसित देशाशी तुलना करता भारतीय शेतीचे उत्पादन व उत्पादकता फारच कमी असल्याचे दिसून येते. वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी शेतीची उत्पादकता वाढविणे आवश्यक आहे. शेतीची उत्पादकता अल्प असण्यामागे अनेक करणे आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे शेतीचे तुकडीकरण झाले त्याच बरोबर वित्तीय साह्याची पुरेशी सुविधा नाही अशिक्षित शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक असल्याने शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा व संकरित बी-

DEGLOOR COLLEGE DEGLOOR EDUCATION SOCIETY'S Dist. Nanded

बियाणांचा वापर मर्यादितच केला जातो. सिंचन व्यवस्थेचा अभाव त्यामुळेही शेतीची अल्प उत्पादकता आहे.

**५. भांडवल उभारणीची समस्या :**

भारतीय अर्थव्यव्थे समोरिल सर्वात मोठी भांडवल उभारणीची समस्या आहे. भारतातील दरडोई उत्पन्न कमी असल्याने ही समस्या अजून गंभीर होत चालली आहे. मुळातच महत्वाचे म्हणजे मुबलक भांडवल हीच अर्थव्यवस्थेच्या विकासाची गुरुकिल्ली असते. परंतु भारतात भांडवल उत्पादन गुणोत्तर प्रमाण फारच अलप आहे. जोपर्यंत भांडवल निर्मिती मोठ्या प्रमाणावर होणार नाही तोपर्यंत अर्थवयवस्थेचा विकास साधणे शक्य नाही.

**६. शिक्षण व आरोग्याच्या समस्या :**

भारताची लोकसंख्या ज्या वेगाने वाढते आहे त्या प्रमाणात शिक्षणाच्या व आरोग्याच्या सुविधेत वाढ झालेली नाही. म्हणूनच आज ही भारत मानवविकास निर्देशाकांत पिछाडीवर आहे. लोकसंख्येच्या तुलनेत उच्च शिक्षणाच्या सुविधा आजही उपलब्ध नाहीत. प्राथमिक माध्यमिक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध असल्या तरीही त्यावर अतिरिक्त ताण येत आहे. आरोग्याच्या बाबतीतही अशीच समस्या आहे तालुका स्तरावर शासकीय रुग्णालयाची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते ती सुविधा देखील अपुरी अशीच आहे थोडक्यात भारतात आज ही शिक्षण व आरोग्याच्या मोठ्या समस्या आहेत.

**७. तांत्रिक मागासलेपणा :**

भारत आज ही तंत्रज्ञानाच्या बाबतीत मागासलेले राष्ट्र आहे. जुनाट तंत्रज्ञानामुळे उत्पादकता वाढत नाही. नवीन तंत्रज्ञान खरेदीसाठी भांडवल नाही. बौध्दिक क्षमता असून देखील नवीन तंत्रज्ञानाच्या शोधकार्यासाठी भारताकडे भांडवल नाही. भारतासारख्या कृषीप्रधान देशात आजही शेतीत जुनाट तंत्रज्ञान वापरले जाते त्यामुळे शेतीची उत्पादकता अल्प आहे. उद्योग, उर्जा, वाहतुक, दळण-वळण इ. बाबतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढलेला असला तरी विकसीत राष्ट्रांच्या तुलनेत फारच अल्प असा आहे.

वरील आव्हाना बरोबरच लघु व कुटीर उद्योगाचया भांडवलाच्या व तंत्रज्ञानाच्या समस्या, पायाभूत सुविधांच्या समस्या, वाहतुक व दळण-वळण वळणाच्या साधणाच्या समस्या, रस्ते, रेल्वे इ. च्या समस्या, उत्पन्न विषमता तसेच स्त्री-पुरुष लिंग गुणोत्तर असमान अशा अनेक समस्या भारतीय अर्थव्यवस्थेसमोर आहेत.

आज माहिती तंत्रज्ञानाच्या युगात भारतात अजूनही रुढी परंपरा दिसून येतात. तेव्हा शिक्षणाचा प्रसार वाढवून आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती तळा-गाळा पर्यंतच्या लोकांपर्यंत पोहोचवली तर वरील समस्या सोडविण्यास नक्कीच मदत होईल. त्याच बरोबर तयार केलेल्या योजना

प्रभावीपणे राबविण्याची देखील गरज आहे. तरच ही आव्हाने संपुष्टात येतील.

## संदर्भ सूची :-

१. भारतीय अर्थव्यवस्था : मिश्र. पुरी
२. भारतीय अर्थव्यवस्था : डॉ. वसुधा पुरोहित
३. लोकसंख्या आणि समाज : डॉ. कांचोळे दा. धो.
४. कृषी अर्थशास्त्र : डॉ. मिश्रा
५. भारतीय अर्थव्यवस्था : देसाई भालेराव.

## ज्योतीचंद्र पब्लिकेशन, लातूर.

**ISBN नंबर नुसार पुस्तक प्रकाशनाची सुवर्ण संधी**

**वैशिष्ट्ये :-**

१) विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक व इतर लेखकांचे पुस्तक 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर ISBN नंबर नुसार प्रकाशित करणे.
२) संशोधक, प्राध्यापक यांच्या M.Phil, Ph.D. संशोधनात्मक पुस्तकांना विशेष प्राधान्य.
३) यु.जी.सी. च्या नवीन मार्गदर्शक तत्त्वानुसार उच्च शिक्षणामध्ये कार्यरत संशोधनार्थी व प्राध्यापक यांना आपले पुस्तक ISBN नुसारच प्रकाशित करणे आवश्यक आहे. तरी, संशोधनार्थी व प्राध्यापक यांनी आपले मौलिक साहित्य ISBN नुसार प्रकाशित करून घ्यावे, ही विनंती.

**- संपर्कासाठी पत्ता -**

प्रकाशक,
ज्योतीचंद्र पब्लिकेशन
"ग्यानदेव-पार्वती", R-9/139/6, विशाल शाळेजवळ,
एल.आय.सी. कॉलनी, प्रगती नगर, लातूर.
ता. जि. लातूर - 413531.(महाराष्ट्र),भारत
**ऑफिस फोन नं. - 02382 - 241913**
मो. नं.9423346913, 9503814000, 9637935252, 7276301000

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist Nanded